3L

## MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1989.

## THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1986.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ३० सप्टेंबर १९८९, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग

## MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1989.

## AN ACT TO CONSOLIDATE AND AMEND THE LAW RELATING TO THE REHABILITATION OF PERSONS AFFECTED BY CERTAIN PROJECTS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २३ ऑक्टोबर १९८९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

महाराष्ट्र राज्यातील विवक्षित प्रकल्पांमुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करणे यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील विवक्षित प्रकल्पांमुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा

तदनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६' असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल.

(४) (अ) ज्या पाटबंधारे प्रकल्पाचे बाधित क्षेत्र ५० हेक्टरांहून अधिक असेल किंवा लाभधारक क्षेत्र २०० हेक्टरांहून अधिक असेल, किंवा गावठाण बाधित होत असेल, अशा सर्व पाटबंधारे प्रकल्पांना तो लागू होईल.

(ब) राज्य शासनाच्या मते, लोकहिताच्या दृष्टीने तो, इतर कोणत्याही प्रकल्पाला लागू करणे जेथे आवश्यक व इष्ट असेल तेथे राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे जाहीर करु शकेल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रकल्पाच्या संबंधात तो लागू होईल आणि त्यानंतर या अधिनियमाच्या तरतुदी अशा प्रकल्पाला लागू होतील.

(क) खंड (अ) व (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, आंतरराज्यीय प्रकल्पाला तो लागू होणार नाही.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ लावणे अपेक्षित नसेल तर,—

(१) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात "बाधित परिमंडल" म्हणजे, त्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या परिमंडलाचे क्षेत्र म्हणून कलम १३ अन्वये घोषित केलेले क्षेत्र;

(२) "प्रकल्पबाधित व्यक्ती" म्हणजे,—

(अ) एखाद्या प्रकल्पाच्या प्रयोजनांकरिता, कलम १४ अन्वये ज्या भोगवटादाराची प्रकल्पबाधित परिमंडलातील जमीन (गावठाणातील जमीन धरून) संपादित करण्यात आली असेल, अशी भोगवटादार व्यक्ती;

**स्पष्टीकरण.**—या उपखंडाच्या प्रयोजनार्थ, जेथे एखाद्या शेत जमिनीची, संबंधित गावाच्या अभिलेखातील नोंद, अविभक्त हिंदु कुटुंबातील कर्ता पुरुष किंवा व्यवस्थापक म्हणून कोणत्याही एका भावाच्या नावे केलेली असेल, तेथे, प्रत्येक भावाला (किंवा मृत भावाचा मुलगा किंवा मुलगे यांना संयुक्तपणे) त्या जमिनीत हिस्सा राहील, मग त्याचे नाव अशा गावाच्या अभिलेखात नोंदलेले असो वा नसो, आणि त्यास प्रकल्पबाधित व्यक्ती म्हणून मानण्यात येईल;

(ब) जमिनीच्या संपादनाच्या वेळी जिच्याकडे संबंधित कुळवहिवाट कायद्यान्वये बाधित परिमंडलातील जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असेल अशी व्यक्ती;

(क) लाभधारक परिमंडलातील ज्या भोगवटादार व्यक्तीची जमीन, मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांखालील कालवे व त्यांचे किनारे यांचे बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकास यांसाठी किंवा बाधित परिमंडलातील व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी नवीन गावठाण वसविण्यासाठी संपादित केली असून,—

(एक) संपादनानंतर जिची उर्वरित लागवडयोग्य धारण जमीन १ हेक्टरहून कमी झाली आहे; किंवा

(दोन) जिची उर्वरित धारण जमीन अशा तुकड्यांमध्ये विभागली गेली आहे की, ते लागवडीच्या दृष्टीने फायदेशीर राहिलेले नाहीत; किंवा

(तीन) जिची उर्वरित धारण जमीन लागवडीस अयोग्य ठरली आहे, अशी भोगवटादार व्यक्ती.

**स्पष्टीकरण.**—या उपखंडाच्या प्रयोजनार्थ "भोगवटदार" या शब्दप्रयोगात जमीन संपादन केली जात असताना संबंधित कुळवहीवाट कायद्यान्वये लाभ झालेल्या परिमंडलातील जमीन प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या कुळाचा समावेश होतो.

(ड) शेतमजूर असलेली व्यक्ती ;

१८९४ चा एक (ई) भोगवटादार नसलेली किंवा उपखंड (अ), (ब), (क) आणि (ड) मध्ये उल्लेख करण्यात न आलेली जी व्यक्ती; भूमि संपादन अधिनियम, १८९४ चे कलम ४ खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपूर्वीच्या लगत ५ वर्षापेक्षा कमी नाही इतक्या अखंड कालावधीसाठी, बाधित परिमंडळातील गावठाणात सर्वसाधारणतः राहात असेल किंवा कोणत्याही व्यापार, व्यवसाय किंवा उपजीविका किंवा मोबदल्यादाखल काम करीत असेल, अशी व्यक्ती ;

(३) "शेतमजूर" म्हणजे बाधित परिमंडलात कोणतीही जमीन धारण न करणारी, परंतु ती जमीन ज्यात आहे असे क्षेत्र कलम १३ अन्वये बाधित परिमंडल म्हणून घोषित केले जाण्याच्या लगतपूर्वी त्या शेतजमिनीवर मुख्यतः शारीरिक श्रम करून आपला चरितार्थ चालविणारी आणि तसा चरितार्थ चालवण्यापासून जिला मुकावे लागले आहे अशी व्यक्ती ;

(४) "शेतजमीन" या संज्ञेत फळबागायत करणे, पिके, गवत किंवा बागायती उत्पन्न काढणे, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, पशुधन पैदास, औषधी वनस्पतींची लागवड करण्यात येणारे रोपमळे किंवा गुरांची चराई, यासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याजोग्या जमिनी यांचा समावेश होतो, परंतु केवळ लाकूड तोडण यासाठी वापरलेल्या जमिनींचा त्यात समावेश होत नाही ;

(५) कोणत्याही प्रकल्पाच्या संबंधात "लाभधारक परिमंडल" म्हणजे त्या प्रकल्पामुळे लाभ झालेल्या परिमंडलाचे क्षेत्र म्हणून कलम १३ अन्वये घोषित करण्यात आलेले क्षेत्र ;

१९६६ चा महाराष्ट्र ४१. (६) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(७) "लागवड करणे" म्हणजे, कोणतेही शेतीविषयक काम करणे व "लागवड" या शब्दप्रयोगाचा अर्थ तद्नुसार लावण्यात येईल;

(८) "धारणजमीन" म्हणजे, भोगवटादार किंवा कूळ म्हणून किंवा त्या दोन्ही नात्यांनी एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ;

(९) "भूसंचय" म्हणजे बाधित व्यक्तीच्या पुनर्वसनाकरिता उपलब्ध असतील अशा, कलम १४ ची पोट-कलमे (१) व (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी ;

(१०) "प्रकल्प" म्हणजे,—

(अ) पाटबंधारे प्रकल्प व त्याचा अर्थ पाटबंधाऱ्यांच्या प्रयोजनार्थ, पाणीपुरवठा करण्यासाठी केलेले कोणतेही बांधकाम, बांधकामाचा विस्तार, सुधारणा किंवा विकास ;

(ब) वीज प्रकल्प म्हणजे, वीजनिर्मिती किंवा वीजपुरवठा यांसाठी उभारलेले कोणतेही काम अथवा वीजविषयक विकासाला पोषक असे कोणतेही काम, यासंबंधाचे बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकास ;

(क) लोकोपयोगी प्रकल्प म्हणजे, पाटबंधारे प्रकल्प किंवा वीज प्रकल्प यांच्याव्यतिरिक्त लोकोपयोगासाठी केलेले कोणतेही बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकास; किंवा

(ड) अशा दोन किंवा अधिक प्रकल्पांचा कोणताही संयुक्त प्रकल्प ;
आणि त्यामध्ये ज्यामुळे, अशा प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीचे धारक किंवा भोगवटादार बाधित होतात आणि ज्यांच्यासंबंधात कलम ११ अन्वये अधिसूचना काढण्यात आली आहे, असे एखाद्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीशी आनुषंगिक किंवा त्यास पूरक असणारे कोणतेही बांधकाम, विस्तार, सुधारणा किंवा विकासविषयक कामे यांचा समावेश होतो ;

(११) "प्रकल्प प्राधिकारी" म्हणजे, ज्याच्याकडे प्रकल्पाची पूर्तता करण्याच्या कामाचे सर्वसाधारण नियंत्रण व देखरेख करण्याचे काम निहित केलेले आहे असा अधिकारी; आणि त्यामध्ये, राज्य शासन, ज्यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्रकल्प प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित करील अशा अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(१२) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित;

(१३) "महसूल विभाग" म्हणजे, अधिनियमाच्या कलम ३ अन्वये जो महसुली विभाग होईल असे महसुली क्षेत्र;

(१४) "नियम" म्हणजे, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेले नियम;

(१५) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची;

(१६) "जिल्हा परिषद" म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद; १९६२ चा महाराष्ट्र ५.

(१७) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये जे अर्थ नेमून दिले असतील, तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

### मुख्य नियंत्रणाधिकारी, प्रकल्प प्राधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये

मुख्य नियंत्रणाधिकारी, प्रकल्प प्राधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये.

३. महसुली विभागातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाशी संबंधित सर्व बाबींमध्ये मुख्य नियंत्रणाधिकार, राज्य शासनाचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण यांच्या अधीनतेने अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेल्या आयुक्तांकडे निहित राहील.

मुख्य नियंत्रणाधिकाऱ्याची कर्तव्ये व कार्याधिकार.

४. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण व विशेष आदेशाच्या अधीन आयुक्ताची कर्तव्य पुढीलप्रमाणे असतील, —

(अ) आपल्या विभागातील बाधित व्यक्तीच्या पुनर्वसनाच्या संबंधात राज्य शासनाने आखलेल्या धोरणाच्या चौकटीत पुनर्वसन कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे ;

(ब) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधीच्या कामात समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे ;

(क) संबंधित जिल्हाधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी यांना प्रकल्पाच्या कामाबरोबरच पुनर्वसनाचे काम हाती घेण्यास सांगून व बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाच्या संबंधात झालेल्या प्रगतीची माहिती ठराविक कालांतराने त्यांच्याकडून मागवून आणि त्या त्या प्रकरणाच्या परिस्थितीत जरूर असेल तसे मार्गदर्शन व सहाय्य त्यांना देऊन बाधित व्यक्तींचे शीघ्र पुनर्वसन होण्याची खात्रीलायक व्यवस्था करणे ;

(ड) आपल्या विभागातील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन पार पाडण्याकरिता निधीची तरतूद करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे ;

(ई) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता आपल्या अखत्यारात यथोचितरीत्या मिळालेले अनुदान बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता आपणास योग्य वाटेल अशा अधिकाऱ्यांना व प्राधिकाऱ्यांना त्यांच्या गरजांनुसार व योग्य वाटेल अशा कालांतराने संवितरित करणे ; आणि

(फ) राज्य शासन वेळोवेळी लेखी आदेशाद्वारे आपणावर सोपवील अशी इतर कार्ये पार पाडणे.

५. जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,— जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये व कार्याधि

(अ) जिल्हाधिकाऱ्याच्या जिल्ह्यातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधीच्या कामात समन्वय साधणे व त्यावर देखरेख ठेवणे ;

(ब) प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधात राज्य शासनाने आखलेल्या धोरणाच्या चौकटीनुसार प्रकल्पबाधित व्यक्तींचे शीघ्र पुनर्वसन होते आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी प्रकल्पाधिकारी व प्रकल्पाच्या कामावर नियुक्त केलेले दुय्यम अधिकारी यांना वेळोवेळी त्यांना नेमून देण्यात येईल असे पुनर्वसनाचे काम करण्यास भाग पाडणे;

(क) राज्य शासन किंवा आयुक्त, वेळोवेळी, लेखी आदेशाद्वारे त्याच्याकडे सोपवील अशी इतर कामे करणे.

६. प्रकल्प प्राधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,— प्रकल्प प्राधिकाऱ्या कर्तव्ये व कार्याधिक

(अ) राज्य शासनाने किंवा आयुक्ताने किंवा जिल्हाधिकाऱ्याने, प्रकल्प प्राधिकाऱ्याकडे सोपविले असेल त्याप्रमाणे बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता प्रस्थापित केलेल्या नवीन गावठाणात किंवा प्रकरणपरत्वे, विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागात आवश्यक नागरी सुविधा पुरविण्याचे असे काम करणे;

(ब) जिल्हाधिकाऱ्याच्या सर्वसाधारण देखरेखीखाली व मार्गदर्शनाखाली बाधित व्यक्तींच्या त्वरित पुनर्वसनाकरिता उपाययोजना करणे;

(क) वैध रीतीने करण्यात आलेल्या कोणत्याही राखीव जागांच्या तरतुदींस अधीन राहून प्रकल्पबाधित कुटुंबातील किमान एका व्यक्तीस, जर अशी व्यक्ती प्रकल्प आस्थापनेवरील सेवेच्या वर्ग तीन आणि वर्ग चार प्रवर्गातील पदांसाठी असलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार अशा पदांसाठी पात्र असेल तर, रोजगार मिळण्याबाबत सर्वोच्च प्राधान्य देणे.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ "कुटुंब" या शब्दप्रयोगाचा अर्थ बाधित व्यक्तीचा विवाहसाथी आणि अशा बाधित व्यक्तीबरोबर राहात असणारा आणि तिच्यावर अवलंबून असणारा तिचा मुलगा, अविवाहित मुलगी, किंवा भाऊ किंवा बहीण असा आहे;

(ड) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता वसवलेल्या नवीन गावठाणात किंवा विस्तारित विद्यमान गावठाणात नागरी सुविधा पुरविण्याच्या कामाकरिता निधीची तरतूद करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे ;

(ई) बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता किती जमीन व इतर सुविधा पुरविणे आवश्यक आहे याचा अंदाज घेण्यासाठी प्रकल्पाअन्वये बाधित व लाभधारक होणाऱ्या परिमंडलाविषयीची माहिती व आराखडे प्रकल्पाच्या योजनेच्या आणि अंमलबजावणीच्या निरनिराळ्या टप्प्यांत आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांना सादर करणे.

अधिकार व कर्तव्ये दुय्यम असे कान्या-कडे नेमून योजित करण. अधिकाऱ्यांकडे

७. (१) राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि त्यास योग्य वाटतील असे निर्बंध व शर्ती यांच्या अधीन राहून आयुक्त किंवा जिल्हाधिकारी किंवा प्रकल्प प्राधिकारी यांना या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी व त्यांस नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यांपैकी राज्य शासनाला योग्य व इष्ट वाटतील असे अधिकार व कर्तव्ये, त्यास योग्य व इष्ट वाटतील अशा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील.

(२) जिल्हाधिकाऱ्यास लेखी आदेश काढून त्याद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी व त्यास नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यांपैकी काही अधिकार व कर्तव्ये आयुक्ताच्या मान्यतेस अधीन राहून, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा,—

(अ) तहसिलदारापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडे; किंवा

(ब) राज्य शासनाच्या अथवा, स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे;

प्रत्यायोजित करता येतील.

(३) प्रकल्प प्राधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांपैकी व त्यास नेमून देण्यात आलेल्या कर्तव्यांपैकी काही अधिकार व कर्तव्ये उप-अभियंत्यापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

अधिकारी व कर्मचारी यांची अधीनता.

८. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमान्वये, नियुक्त केलेला जिल्हाधिकारी, प्रकल्प प्राधिकारी आणि इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे आयुक्ताच्या अधीन असतील.

सल्लागार समिती स्थापन करणे.

९. राज्य शासनास, प्रकल्पबाधित व्यक्तींच्या त्वरित पुनर्वसनाच्या कामी त्यास सहाय्य करण्याकरिता, त्याच्याकडे किंवा त्यांच्याकडे पाठविण्यात येतील अशा बाबींवर त्याला सल्ला देण्यासाठी व बाधित व्यक्तींच्या पुनर्वसन योजनेशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येतील अशा बाबींवर त्यास अधिकाऱ्यांना सल्ला देण्यासाठी एक किंवा अनेक समित्या स्थापन करता येतील. अशा समितीची रचना, तिच्या कामकाजाचे विनियमन, तिच्या सदस्यांना द्यावयाचे कोणतेही भत्ते किंवा फी असल्यास, असे भत्ते व फी, व त्यांच्याशी आनुषंगिक असणाऱ्या सर्व बाबी ह्या, राज्य शासन, वेळोवेळी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

### बाधित व्यक्तींचे पुनर्वसन

बाधित व्यक्तींचे पुनर्वसन.

१०. (१) राज्य शासन, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या तरतुदींनुसार, पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या क्षेत्रांतील बाधित व्यक्तींचे पुनर्वसन करण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध झाल्यास अशा प्रकल्पापासून लाभ मिळत असलेल्या गावांतील जमिनीवर किंवा क्षेत्रांवर त्यांचे पुनर्वसन करील.

(२) या अधिनियमाचे कलम १४ किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील तरतुदी यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्य शासनास, या अधिनियमाद्वारे किंवा अधिनियमाखाली करण्यात आलेल्या इतर तरतुदींनुसार, ज्यांचे पुनर्वसन करावयाचे राहिलेले आहे अशा, अन्य कोणत्याही प्रकल्पामुळे मग त्या प्रकल्पाला या अधिनियमाच्या तरतुदी लागू असोत अथवा नसोत — तसेच अन्य पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या परिमंडलातील शक्यतितक्या बाधित व्यक्तींचे—

(अ) कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पामुळे लाभ झालेल्या परिमंडलातील जमिनीवर किंवा यथास्थिति, कलम १४ च्या तरतुदींनुसार जमीन संपादन करून त्याद्वारे इतर गावांमधील किंवा क्षेत्रांतील जमिनीवर, किंवा

(ब) भू-संचयातील अन्य कोणत्याही जमिनीवर,

पुनर्वसन करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(३) राज्य शासन, बाधित व्यक्तींच्या पुनर्वसन प्रयोजनार्थ स्थापन केलेल्या नवीन गावठाणात किंवा कोणत्याही विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागात विहित प्रमाण व पद्धतीनुसार नागरी सुविधांची तरतूद करील आणि अशा सुविधांमध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल :—

(अ) पिण्याच्या पाण्यासाठी खोदलेल्या विहिरी किंवा विंधण विहिरी किंवा नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची योजना ;

(ब) खेळाचे मैदान असलेली शाळा ;

(क) चावडी किंवा समाज मंदिर ;

(ड) अंतर्गत मार्ग आणि पोच मार्ग ;

(ई) वीजपुरवठा ;

(फ) दहनभूमि किंवा यथास्थिति दफनभूमि ;

(ग) बांधलेली उघडी गटारे ;

(ह) सार्वजनिक शौचकूप ;

(आय) गुरांच्या तळासाठी जमीन ;

(ज) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस सेवेच्या बस थांब्यांकरिता जमीन ;

(के) आवश्यक असेल तेथे मळणीसाठी जमीन म्हणजेच, खळवाडी ;

(एल) गायरान जमीन (सरकारी जमीन उपलब्ध असल्यास) ;

(एम) बाजारासाठी आणि गावठाणाच्या विस्तारासाठी जमीन ;

आणि या सर्व सुविधांवरील खर्च हा प्रकल्पाच्या खर्चाचा एक भाग असेल.

बाधित आणि लाभधारक परिमंडलामधील अधिसूचित करावयाची क्षेत्रे.

११. (१) राज्य शासन ज्यांना हा अधिनियम लागू होतो अशा प्रकल्पाच्या संबंधात शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे —

(अ) अशा प्रकल्पाच्या बाधित किंवा लाभधारक परिमंडलामध्ये येण्याची शक्यता आहे अशी गावे किंवा क्षेत्र, कोणतीही असल्यास, विनिर्दिष्ट करील ;

(ब) कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध ज्यांना लागू होतील असे, अशा गावातील किंवा क्षेत्रातील धारण जमिनीचे क्षेत्र तात्पुरते विनिर्दिष्ट करील ;

(२) जी गावे किंवा क्षेत्रे बाधित आणि लाभधारक क्षेत्रे असण्याची शक्यता आहे अशा गावांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये दवंडी पिटून आणि अशा अधिसूचनची एक प्रत या परिमंडलात एखाद्या ठळक जागी आणि गाव चावडीवर आणि कोणतीही पंचायत असल्यास, तिच्या कार्यालयात आणि तहसिलदाराच्या आणि जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात लावून अशी अधिसूचना जाहीर करण्यात येईल.

जमिनीचे हस्तांतरण, पोट-विभागणी किंवा विभाजन किंवा रुपांतरण यावरील निर्बंध.

१२. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात, काहीही अंतर्भूत असले तरीही कलम ११ खालील अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर व कोणत्याही विशिष्ट गावाच्या किंवा त्यातील क्षेत्राच्या लाभधारक परिमंडलातील आणखी कोणतीही जमीन या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक नाही अशा आशयाची घोषणा जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात येईपर्यंत, कलम ११ खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावातील किंवा क्षेत्रातील कोणत्याही कृषि जमिनी राज्य शासनाची लेखी परवानगी असेल त्या व्यतिरिक्त —

(अ) विक्रीच्या रूपाने (दिवाणी न्यायालयाच्या हुकमनाम्याची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करताना केलेली विक्री धरून) किंवा देणगीच्या, विनिमयाच्या, पट्ट्याच्याद्वारे किंवा अन्य रूपाने हस्तांतरित करता येणार नाहीत,

(ब) त्यांची पोट-विभागणी (कोणत्याही न्यायालयाची किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा हुकुमनामा, निवाडा किंवा आदेश याद्वारे केलेली पोट विभागणी धरून) करता येणार-नाही; किंवा

(क) त्यांचे विभाजन (कोणत्याही न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशान्वये केलेले विभाजन धरून) करता येणार नाही; किंवा

(ड) त्यांचे कृषीतर प्रयोजनार्थ रूपांतरण करता येणार नाही.

(२) जमिनीच्या हस्तांतरणामुळे, पोट-विभागणीमुळे किंवा विभाजनामुळे किंवा रूपांतरणामुळे या अधिनियमाचा उद्देश विफल होण्याची शक्यता आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, त्यास, अशी परवानगी देण्याचे नाकारता येईल, किंवा त्यास या अधिनियमाचा उद्देश अंमलात आणण्यासाठी ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने अशी सर्वसाधारण किंवा विशेष परवानगी देता येईल. अशा शर्तीमध्ये अशी परवानगी देण्याच्या लगतपूर्वी असलेल्या कोणत्याही विहित धारण जमिनीच्या आधारे, कलम १४ खाली सक्तीने संपादन करण्यास पात्र असलेल्या जमिनीच्या क्षेत्रावर या परवानगीचा कोणताही परिणाम होता कामा नये, या शर्तीचाही समावेश असेल.

(३) पोट-कलम (१) चे किंवा पोट-कलम (२) खाली घातलेल्या कोणत्याही शर्तीचे, उल्लंघन करून केलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण, पोट-विभागणी किंवा विभाजन किंवा रूपांतरण निरर्थक व अप्रवर्ती असेल.

(४) राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, पोट-कलमे (१) आणि (२) खालील आपले अधिकार, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा कोणत्याही शर्ती व मर्यादा असल्यास त्यांच्या अधीनतेने, अशा सर्व किंवा कोणत्याही आयुक्तांस किंवा जिल्हाधिकाऱ्यांस प्रदान करू शकेल.

(५) कलम ११ खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांतील किंवा क्षेत्रांतील आणि जिला या कलमामध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध लागू आहेत अशा जमिनीची अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास किंवा तत्पूर्वी, करण्यात आलेली कोणतीही पोट-विभागणी किंवा विभाजन हे, कलम १४,पोट-कलम (४) च्या प्रयोजनांसाठी विचारात घेतले जाणार नाही ; मात्र अशी पोट-विभागणी किंवा विभाजन हे,—

(अ) त्याची मोजमापे व हद्दी ठरवूनच केलेले असले पाहिजे व रीतसर प्रमाणन केल्यानंतर संबद्ध ग्राम अभिलेखात त्यासंबंधात तशी नोंद केलेली असली पाहिजे ;

(ब) तशा अर्थाच्या हुकूमनाम्याद्वारे ते केलेले असले पाहिजे आणि रीतसर प्रमाणन केल्यानंतर, संबद्ध ग्राम अभिलेखात त्यासंबंधीच्या नोंदी केलेल्या असल्या पाहिजेत किंवा संबद्ध ग्राम अभिलेखात त्यानुसार नोंदी करण्याकरिता महसूल प्राधिकाऱ्यापुढे त्याबाबतची कार्यवाही प्रलंबित असली पाहिजे.

१३. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि कलम ११, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अशी अधिसूचना प्रसिद्ध करूनसुद्धा पुढील बाबी घोषित करील,— बाधित किंवा लाभधारक परिमंडलातील क्षेत्र घोषित करणे.

(अ) प्रकल्पाखालील बाधित परिमंडलाच्या क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या क्षेत्राची व्याप्ती ;

(ब) प्रकल्प हा पाटबंधारे प्रकल्प असेल तर, प्रकल्पाखालील लाभधारक परिमंडलाच्या क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या क्षेत्राची व्याप्ती ;

(क) अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या टप्प्यांपैकी कोणता टप्पा, लाभधारक परिमंडलातील जमिनीच्या संपादनाच्या प्रयोजनासाठी, अशा प्रकल्पास लागू असेल.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना प्रसिद्ध होण्यापूर्वी जिल्हाधिकारी, कलम ११, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि शासकीय राजपत्रात तसेच, बाधित व लाभधारक परिमंडलातील अशा गावांचा व क्षेत्रांचा समावेश असणाऱ्या स्थानिक क्षेत्रामध्ये प्रसृत होणाऱ्या मराठी भाषेतील एका दैनिक वृत्तपत्रामध्ये, प्रसिद्ध करून, पोट-कलम (१), खंड (अ) आणि (ब) खाली येणाऱ्या जमिनींच्या संबंधात, आक्षेप किंवा सूचना मागविणारी जाहीर नोटीस देईल. अशा क्षेत्रातील जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही आक्षेप किंवा सूचना असल्यास, असे आक्षेप किंवा सूचना ज्या तारखेस अशी जाहीर नोटीस संबंधित गावामध्ये किंवा क्षेत्रामध्ये दवंडी पिटवून प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या तारखेपासून किंवा ती ज्या तारखेस पूर्वी म्हटल्याप्रमाणे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, या दोहोंपैकी नंतरची असेल अशा तारखेस, जिल्हाधिकाऱ्याकडे करता येतील आणि जिल्हाधिकारी, त्यासंबंधीच्या त्याच्या अहवालासह अशा तऱ्हेने पाठविण्यात आलेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना शक्य तितक्या लवकर राज्य शासनाकडे पाठवील. राज्य शासन, अहवालाचा आणि कोणतेही आक्षेप किंवा सूचना असतील तर त्यांचा विचार करून त्यास योग्य वाटेल असा आदेश संमत करील.

(३) प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या काळात कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेत नमूद केलेल्या क्षेत्रांत कोणताही बदल करणे आवश्यक आहे याबद्दल प्रकल्प प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, तो असा बदल, त्या संबंधातील कारणे, योजना, आणि तपशील यासह जिल्हाधिकाऱ्यामार्फत राज्य शासनास कळवील.

(४) पोट-कलम (३) अन्वये कळविण्यात आलेली माहिती आणि जिल्हाधिकारी याचा अहवाल, कोणताही असल्यास, तो मिळाल्यानंतर, राज्य शासन, प्रकल्प प्राधिकाऱ्यांनी दिलेली आणि जिल्हाधिकारी याचा अहवाल कोणताही असल्यास, त्यातील कारणे विचारात घेऊन आणि त्यास योग्य वाटेल अशी कोणतीही चौकशी, असल्यास, ती केल्यावर पोट-कलम (१) आणि (२) मध्ये घालून दिलेल्या रीतीने बदल करू शकेल.

१४. (१) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या जिल्हाधिकाऱ्यास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन खरेदी करण्यासाठी किंवा तिची अदलाबदल करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीशी करार करता येईल : या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी जमीन संपादन करण्याचा अधिकार.

परंतु, या पोट-कलमाअन्वये, कराराखालील भरण्यात येणारी रक्कम ही पोट-कलम (२) च्या तरतुदीनुसार जमीन संपादन करण्यात आली असता अशा जमिनीकरिता भरपाई म्हणून देण्यात यावयाच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.

(२) या कलमातील तरतुदींच्या अधीनतेने, राज्य शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, 'भूमि संपादन अधिनियम, १८९४' खाली सक्तीनेसुद्धा जमीन संपादन करता येईल, आणि उक्त प्रयोजनांसाठी केलेले कोणत्याही जमिनीचे संपादन हे, त्या अधिनियमाच्या अर्थान्तर्गत सार्वजनिक प्रयोजन असल्याचे मानण्यात येईल. १८९४ चा १.

(३) राज्य शासनास, व्यवहार्य असेल तेथवर अनुसूचीच्या भाग एक मधील तरतुदींना अनुसरून बाधित परिमंडलातील, गावठाणात समाविष्ट केलेल्या जमिनीसुद्धा संपादन करता येतील.

(४) एखाद्या पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधित परिमंडलातील ज्या बाधित व्यक्तींचे पुनर्वसन व्हावयाचे आहे अशा व्यक्तींसकट पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधीत परिमंडलातील बाधित व्यक्तींचे जमिनीवर पुनर्वसन करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनास, कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेत घोषित केलेल्या टप्प्यानुसार प्रकल्पाच्या लाभधारक परिमंडलातील धारण जमिनीमधून आणि आवश्यकतेप्रमाणे इतर कोणत्याही गावातील किंवा क्षेत्रातील जमिनीमधून जमिनीचे संपादन करता येईल.

(५) या कलमान्वये संपादन केलेल्या सर्व जमिनी हा भूसंचयाचा भाग बनेल.

**पुनर्वसनाचे प्रस्ताव तयार करणे व ते प्रसिद्ध करणे.** १५. राज्य शासन याबाबतीत देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, एखाद्या प्रकल्पाखालील बाधित परिमंडलातील बाधित व्यक्तींच्या पुनर्वसनाकरिता जिल्हाधिकारी, परिस्थितीनुसार, वेळोवेळी, एका किंवा अधिक टप्प्यांत प्रस्ताव तयार करील व कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये घालून दिलेल्या रितीने, असे प्रस्ताव अंतर्भूत असलेली एक नोटीस अशा बाधित व्यक्तींच्या माहितीकरिता प्रसिद्ध करील.

**जमीन देणे व अभि-हस्तांकन.** १६. (१) जी व्यक्ती कलम १५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या योजनेमधील प्रयोजनासाठी दाखविलेल्या क्षेत्रातील जमीन किंवा भूखंड किंवा दोन्ही घेण्यास इच्छुक आहे अशी कोणतीही पात्र बाधित व्यक्ती, जिल्हाधिकाऱ्याकडे, जमीन किंवा भूखंड मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये अर्ज करू शकेल; आणि विहित करण्यात येतील, अशा नियमांच्या अधीनतेने, जिल्हाधिकाऱ्याने, शक्यतोवर अनुसूचीच्या भाग तीन व चारच्या तरतुदीनुसार व विहित करण्यात येईल अशा पद्धतीने व अशा अटींवर व शर्तींवर,—

(अ) कलम १४ अन्वये संपादित केलेली जमीन अशा बाधित व्यक्तीस मंजूर करणे ;

(ब) अशा बाधित व्यक्तीस नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील भूखंड मंजूर करणे,

विधिसंमत असेल :

परंतु,—

(एक) कलम २, पोट-कलम (२), खंड (इ) मध्ये निर्देश करण्यात आलेली बाधित व्यक्ती केवळ खंड (ब) अन्वये भूखंड मिळण्यास पात्र असेल.

(दोन) पोट-कलमे (२) व (३) च्या तरतुदीस अधीन राहून, खंड (अ) किंवा (ब) अन्वये देण्यात आलेल्या जमिनीची किंवा भूखंडाची भोगवट्याची किंमत विहित करण्यात येईल अशा रीतीने निर्धारित करण्यात व प्रदान करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जमीन किंवा भूखंड दिला जाण्यास पात्र असणारी बाधित व्यक्ती, पुढील कारणांवरून अशी जमीन किंवा भूखंड मिळण्याचा आपला हक्क गमावील—

(अ) त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याकडून तिला नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या मुदतीत, (तिला देऊ करण्यात आलेली) अशी जमीन किंवा भूखंड स्वीकारण्याची आपली इच्छा असल्याचे कळविण्यात कसूर करील; किंवा

(ब) तिच्याकडून बाधित परिमंडलातील जी जमीन किंवा ज्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्यांच्या मोबदल्यात तिला मिळालेल्या नुकसानभरपाईची रक्कम किंवा पोट-कलम (१) च्या

उपखंड (अ) अन्वये तिला मंजूर करण्यात यावयाची संभाव्य किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या पासष्ट टक्के इतकी रक्कम जमिनीच्या भोगवटयाची किंमत म्हणून अशा बाधित व्यक्तीस अशी नुकसानभरपाई देण्याच्या वेळेस जिल्हाधिकाऱ्याकडे जमा करण्यात कसूर करील.

(३) पोट-कलम (२) च्या खंड (ब) अन्वये रकमेचे प्रदान करण्यात आल्यानंतर बाधित व्यक्तीने तिला दिलेल्या जमिनीच्या भोगवटयाच्या किमतीपोटी द्यावयाची उरलेली रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा हप्त्यांमध्ये त्याच्याकडून विनव्याजी वसूल करण्यात येईल :

परंतु, अशा वसुलीचा पहिला हप्ता, त्यास सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यानंतर एका वर्षाने सुरू होईल.

मांडणीचे कार्यान्वयन प्रकल्प प्राधिकाऱ्याकडे किंवा अन्य कोणत्याही अभिकरणाकडे सोपवणे आणि ते पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेकडे ते निहित होणे.

१७. नवीन गावठाणाच्या किंवा यथास्थिति विद्यमान गावठाणाच्या विस्ताराच्या प्रत्येक मांडणीचे कार्यान्वयन, सार्वजनिक उपयुक्तता, नागरी आणि इतर सुखसोयी व सेवा यांच्याशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर, संबंधित प्रकल्प प्राधिकाऱ्याकडून करण्यात येईल किंवा राज्य शासन, त्यास तसे करणे योग्य वाटेल तर, लेखी आदेशाद्वारे त्यास योग्य वाटेल अशा यंत्रणेकडे ते सोपवील. सदर कामे सर्व बाबतीत पूर्ण झाल्यावर आणि जिल्हाधिकाऱ्याने तशा आशयाचे स्वतःची सही व मोहोर यांनिशी प्रमाणपत्र दिल्यावर, उक्त कामे नवीन गावठाणात किंवा, प्रकरणपरत्वे, विद्यमान गावठाणाच्या विस्तार क्षेत्रात समाविष्ट असलेल्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या जिल्हा परिषदेकडे, तिने ही कामे महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या तरतुदीनुसार देखभालीसाठी विकास योजनेची कामे म्हणून हाती घेतली असल्याचे मानून निहित होतील.

१९६२ चा महाराष्ट्र ५.

भारांचे हस्तांतरण.

१८. (१) बाधित व्यक्तीने बाधित परिमंडलात धारण केलेल्या कोणत्याही जमिनीवर, गहाण, ऋण किंवा अन्य कोणत्याही भाराचा बोजा असेल त्याबाबतीत, असे गहाण, ऋण किंवा अन्य भार त्या जमिनीवरून बदली झाल्याचे व अशा बाधित व्यक्तीला कलम १६ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीशी संलग्न झाला असल्याचे मानण्यात येईल व गहाणधारक, धनको किंवा प्रकरणपरत्वे, अन्य भारस्वामी त्यानुसार आपले हक्क बजावील.

(२) पोट-कलम (१) अन्वये गहाण, ऋण किंवा अन्य भार ज्या जमिनीकडे बदली झाला असेल त्या जमिनीचे बाजारमूल्य, असे गहाण, ऋण किंवा अन्य भार ज्या जमिनीवरून बदली झाला असेल त्यामुळे जमिनीच्या बाजारमूल्यापेक्षा कमी असेल तर, गहाणधारकास, धनकोस किंवा प्रकरणपरत्वे, अन्य भारस्वामीस, जिल्हाधिकारी ठरवून देईल इतकी नुकसानभरपाई अशा जमिनीचा मालक असलेल्या बाधित व्यक्तीकडून मिळण्याचा हक्क असेल.

(३) पोट-कलमे (१) व (२) मध्ये किंवा कोणत्याही संविदेत किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, गहाणधारक, धनको किंवा यथास्थिति, भारस्वामी, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असे गहाण, ऋण किंवा भार या अन्वये दिलेल्या कोणत्याही रकमेसाठी किंवा कर्जासाठी—अशी रक्कम वा कर्ज या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेले असो वा नंतर देण्यात आलेले असो—व्याजादाखल कोणत्याही प्रकारे दिलेल्या मुद्दलाच्या किंवा कर्जाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम वसूल करणार नाही.

## प्रकरण चार

### संकीर्ण

शास्ती.

१९. (१) जर कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखाली जाणूनबुजून खोटी माहिती पुरवील, किंवा या अधिनियमान्वये बाधित व्यक्तीला देण्यात आलेली जमीन कसण्यास अटकाव करील तर तिला दोषसिद्धीअंती पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल :

परंतु, न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाची विरुद्ध अशी विशेष व पर्याप्त कारणे नसतील तेव्हा असा द्रव्यदंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(२) जे कोणी या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करण्यास प्रोत्साहन देतील किंवा असा कोणताही अपराध करण्याचा प्रयत्न करतील तर ते अशा अपराधास जबाबदार धरले जातील आणि दोषसिद्धीनंतर त्यांना अशा अपराधाकरिता पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आलेली शिक्षा करण्यात येईल.

शासनाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी आयुक्त इत्यादींना सहाय्य करणे. २०. कोणत्याही विभागातील शासनाचा प्रत्येक अधिकारी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी जेव्हा त्यास तसे करण्यास सांगण्यात येईल तेव्हा कोणत्याही आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास किंवा प्रकल्प प्राधिकाऱ्यास किंवा या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा यंत्रणेस सहाय्य करण्यास बांधलेला असेल.

या अधिनियमान्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे. २१. या अधिनियमान्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व कर्मचारी हे, भारतीय दंडसंहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

अधिकारितेस प्रतिबंध. २२. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये जो प्रश्न प्रकल्प प्राधिकाऱ्याने, जिल्हाधिकाऱ्याने, आयुक्ताने किंवा राज्य शासनाने मिटविणे, निर्णीत करणे किंवा हाताळणे आवश्यक असेल अशा कोणत्याही प्रश्न मिटविण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा तो हाताळण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही.

या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईस संरक्षण. २३. या अधिनियमान्वये जी सद्हेतूने केली असेल किंवा करण्याचे योजलेले असेल अशा कोणत्याही गोष्टींबद्दल राज्य शासन, स्थानिक प्राधिकरणे किंवा कोणताही लोकसेवक यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम. २४. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील. अशा नियमांत, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी फी आकारण्याची तरतूद करता येईल.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर व त्यांनी असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केला तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा प्रकरणपरत्वे तो मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध यणार नाही.

२५. या द्वारे असे घोषित करण्यात येते की, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३९ याच्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेले उद्दिष्ट साध्य करण्याकरिता व प्रकल्पाचे कार्यान्वियन करणे व कोणत्याही प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या व्यक्तीचे पुनर्वसन करणे व त्याकरिता जमिनी संपादन करून अशा कोणत्याही जमिनी, प्रकल्पबाधित व्यक्तींकडे हस्तांतरित करणे यासंबंधातील राज्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता हा अधिनियम करण्यात येत आहे. राज्याच्या धोरणासंबंधात घोषणापत्र.

## प्रकरण पाच

### निरसन व व्यावृत्ती

२६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापासून 'महाराष्ट्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६' हा याद्वारे निरसित होईल : निरसन व व्यावृत्ती.

१९७६ चा महाराष्ट्र ४१.

परंतु, अशा निरसनामुळे पुढील गोष्टींवर परिणाम होणार नाही :—

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या कायद्याची पूर्वी केलेली अंमलबजावणी अथवा त्याखाली यथोचितरीत्या केलेली किंवा राहिलेली कोणतीही गोष्ट; किंवा

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या कायद्यान्वये संपादित केलेला व उपार्जित झालेला कोणताही हक्क किंवा विशेष हक्क अथवा ओढवलेले बंधन किंवा दायित्व; किंवा

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्याबाबत ओढवून घेतलेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा; किंवा

(ड) पूर्वोक्त कोणतेही असे हक्क, विशेष अधिकार, बंधन, दायित्व, शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांच्याबाबत कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना;

आणि जणू काही हा अधिनियम संमत झाला नाही असे समजून कोणतेही अन्वेषण, कार्यवाही, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करण्यात येईल, चालू ठेवण्यात येईल किंवा अंमलात आणण्यात येईल आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादण्यात येईल :

आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकात व या अधिनियमात इतरत्र करण्यात आलेल्या कोणत्याही व्यावृत्तीविषयक तरतुदींस अधीन राहून, अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या कायद्याच्या तरतुदींअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट, कोणतीही कारवाई (कोणत्याही प्रकल्पाची अंमलबजावणी व त्याच्याशी संबंधित किंवा पूरक असेल अशी कोणतीही गोष्ट धरून) करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा काढण्यात आलेले आदेश, हे जेथवर ते या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर ते या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात किंवा काढण्यात आल्याचे समजण्यात येईल व या अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट, कारवाई, नियम किंवा काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश याद्वारे स्पष्टपणे किंवा गर्भितार्थाने अधिक्रामित करण्यात आल्याखेरीज व करण्यात येईतोपर्यंत, ती गोष्ट, कारवाई, नियम किंवा आदेश तद्नुसार अंमलात असल्याचे चालू राहील.

२७. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, त्या प्रसंगी आवश्यक असेल त्या प्रमाणे राज्य शासनाला, आदेशाद्वारे, अशा तरतुदींशी विसंगत नसलेली व अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक आणि उचित वाटेल अशी, कोणतीही गोष्ट करता येईल : अडचण दूर करणे.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेनंतरचा दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर राज्य शासन या कलमाखाली कोणताही आदेश काढणार नाही.

## अनुसूची

[ कलमे १३(१) (क) आणि १४(३) व (४) आणि १६(१) पहा ]

### भाग एक

| प्रकल्पासाठी संपादन केलेल्या गावठाणातील घरांची टक्केवारी | गावठाणात समाविष्ट असलेल्यापैकी संपादन करावयाच्या जमिनीची व्याप्ती |
|---|---|
| (१) | (२) |
| (अ) गावठाणातील घरांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी घरे किंवा प्रकल्पासाठी संपादन केलेल्या जमिनीपैकी ७५ टक्क्यांपेक्षा कमी जमिनी. | (अ) काही नाही. |
| (ब) गावठाणातील घरांपैकी ७५ टक्के घरे प्रकल्पासाठी संपादन करण्यात येतात. | (ब) संपूर्ण गावठाणात समाविष्ट केलेल्या सर्व जमिनी. |
| (क) गावठाणात समाविष्ट केलेले क्षेत्र, प्रकल्पासाठी संपादन करण्यात आलेले नाही, परंतु गावातील शेतजमिनीच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत आणि गावातील लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या उर्वरित क्षेत्राची व्याप्ती, प्रत्येक वर्षी १५ डिसेंबरपर्यंत लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या गाळपेर जमिनी धरून गावाच्या लागवड केलेल्या क्षेत्राच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. | (क) संपूर्ण गावठाणात समाविष्ट केलेल्या सर्व जमिनी. |

परंतु, एखाद्या गावठाणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, वरील (अ), (ब) व (क) मधील निकषाची प्रतिपूर्ती होत नसेल, परंतु, परिस्थितीमुळे घरांचे किंवा जमिनींचे संपादन करणे भाग असेल त्याबाबतीत, शासनास आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारास संपूर्ण गावठाणातील सर्व घरे किंवा सर्व जमिनी यांचे संपादन करण्याची मुभा असेल आणि त्या प्रकरणी असे संपादन हे सार्वजनिक प्रयोजनासाठी करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

### भाग दोन

| धारण जमिनीचा आकार | संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|
| (१) | (२) |
| टप्पा-१ | |
| (अ) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक असलेले आणि २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक असलेले, परंतु ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |

भाग दोन—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| **टप्पा-१—चालू** | |
| (क) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले आणि ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) २ हेक्टर आणि २ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) २ हेक्टर आणि ८३ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-२** | |
| (अ) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले आणि ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) २ हेक्टर आणि ८३ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (इ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (इ) ३ हेक्टर आणि ६४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-३** | |
| (अ) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ३ हेक्टर आणि २३ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |

भाग दोन—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| **टप्पा-३—चालू** | |
| (क) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ३ हेक्टर आणि ६४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ४ हेक्टर आणि ४४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-४** | |
| (अ) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ४ हेक्टर आणि ४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ४ हेक्टर आणि ४४ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ड) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ५ हेक्टर आणि २५ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ८९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, २ हेक्टर आणि २४ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ८ हेक्टर आणि ८९ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले संपूर्ण क्षेत्र. |
| **टप्पा-५** | |
| (अ) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक नसलेले. | (अ) काही नाही. |
| (ब) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले आणि ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ब) ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ४० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (क) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले आणि ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक नसलेले. | (क) ५ हेक्टर आणि २५ आर पेक्षा अधिक असलेले परंतु, ८० आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |

भाग दोन—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| टप्पा-५—चालू | |
| (ड) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले आणि ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ड) ५ हेक्टर आणि ६६ आर पेक्षा अधिक असलेले परंतु १ हेक्टर आणि २१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ई) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले आणि ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक नसलेले. | (ई) ६ हेक्टर आणि ६ आर पेक्षा अधिक असलेले परंतु १ हेक्टर आणि ६१ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (फ) ८ हेक्टर आणि ९ आर पेक्षा अधिक असलेले आणि ९ हेक्टर आणि ७१ आर पेक्षा अधिक नसलेले. | (फ) ६ हेक्टर आणि ४७ आर पेक्षा अधिक असलेले परंतु २ हेक्टर आणि ४२ आर पेक्षा अधिक नसलेले क्षेत्र. |
| (ग) ९ हेक्टर आणि ७१ आर पेक्षा अधिक असलेले. | (ग) ७ हेक्टर आणि २८ आर पेक्षा अधिक असलेले संपूर्ण क्षेत्र. |

परंतु खंड (ब) चे टप्पे एक, दोन, तीन, चार आणि पाच च्या खाली येणाऱ्या धारण जमिनींच्या बाबतीत, जर भूमि संपादनामुळे त्या धारण जमिनींचा आकार अनुक्रमे १ हेक्टर आणि ६१ आर, २ हेक्टर आणि ४२ आर, ३ हेक्टर आणि २३ आर, ४ हेक्टर आणि ४ आर, आणि ४ हेक्टर आणि ८५ आर पेक्षा कमी होत असेल तर अशा धारण जमिनीतून जमीन संपादन करण्यात येणार नाही :

आणखी असे की, कोणत्याही टप्प्यानुसार, संपादन केलेली जमीन २० आर पेक्षा कमी असणार नाही किंवा 'मुंबई धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७' च्या तरतुदींच्या अन्वये लागवडीयोग्य जमिनीचा तुकडा म्हणून स्वतंत्रपण लागवडीस अयोग्य असलेल्या तुकड्यापेक्षा कमी असणार नाही.

१९४७ चा मुंबई ६२.

भाग तीन

| बाधित परिमंडळामधून संपादित केलेले प्रकल्पबाधित व्यक्तीच्या जमिनीचे क्षेत्र (१) | प्रकल्पबाधित व्यक्तीला मंजूर करावयाचे लाभधारक परिमंडळामधील जमिनीचे क्षेत्र (२) |
|---|---|
| १. ८० आर पेक्षा अधिक नसलेले. | ४० आर पेक्षा कमी नसलेले ८० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| २. ८० आर पेक्षा अधिक असलेले, परंतु २ हेक्टरपेक्षा अधिक नसलेले. | ८० आर पेक्षा कमी नसलेले परंतु, १ हेक्टर आणि २० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| ३. २ हेक्टर्स पेक्षा अधिक असलेले परंतु, ३ हेक्टर्स व २० आर यांपेक्षा अधिक नसलेले. | १ हेक्टर व २० आर पेक्षा कमी नसलेले परंतु, १ हेक्टर व ६० आर पेक्षा अधिक नसलेले. |
| ४. ३ हेक्टर्स व २० आर पेक्षा अधिक. | १ हेक्टर व ६० आर : |

परंतु, प्रकल्पबाधित व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल त्याबाबतीत, २ हेक्टर्स व ८० आर क्षेत्राच्या कमालमर्यादेस अधीन राहून प्रत्येक तीन जादा व्यक्तींसाठी ४० आर इतकी जादा जमीन देता येईल.

आणखी असे की, लाभधारक परिमंडलाव्यतिरिक्त इतर ठिकाणची कोरडवाहू (जिराईत) जमीन देण्यात आली असेल त्याबाबतीत, ती १ हेक्टर व ६० आरपेक्षा कमी असणार नाही :

तसेच, कोणत्याही बाबतीत, अशा प्रकारे जमीन देण्यात आल्यानंतर बाधित व्यक्तींच्या धारण जमिनीची एकूण व्याप्ती, सरकारी जमिनीच्या विल्हेवाटीसंबंधातील अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे तरतूद करण्यात आलेल्या निर्वाहक धारण जमिनीच्या क्षेत्रापेक्षा अधिक असणार नाही.

भाग चार

| बाधित व्यक्तीचा प्रवर्ग (१) | गावठाणात देण्यात यावयाच्या भूखंडाचे क्षेत्र (२) | |
|---|---|---|
| १. शेतकरी .. | (अ) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक नसेल; | ३७० चौरस मीटर. |
| | (ब) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल. | एकूणात ७४० चौरस मीटर एवढ्या कमाल मर्यादेस अधीन राहून प्रत्येक जादा तीन व्यक्तींसाठी १८५ चौरस मीटर एवढे जादा क्षेत्र. |
| २. बिगर शेतकरी | (अ) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक नसेल; | १८५ चौरस मीटर. |
| | (ब) तिच्या कुटुंबातील व्यक्तींची संख्या पाचाहून अधिक असेल; | एकूणात ३७० चौरस मीटरच्या कमाल मर्यादेस अधीन राहून प्रत्येक जादा तीन व्यक्तींसाठी ९२.५ चौरस मीटर एवढे जादा क्षेत्र. |

**स्पष्टीकरण.**—भाग 'तीन' व भाग 'चार' च्या प्रयोजनार्थ, "कुटुंब" म्हणजे बाधित व्यक्तीचा विवाहसाथी, मुलगे, अविवाहित मुली किंवा बहिणी, वडील व आई; मात्र, अशा सर्व व्यक्ती तिच्याकडे राहणाऱ्या व तिच्यावर अवलंबून असणाऱ्या असतील.

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.